# घटक १ : ग्रंथालय आणि समाज

## १.१ सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास (History of Public Library Movement)

सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. सुमारे १४२२ मध्ये डिक रिचर्ड व्हिटिंग्टन यांच्या सूचनेनुसार लंडन येथे नागरिकांकरिता मोफत वाचनालय स्थापन केले गेले. यानंतर सतराव्या शतकाच्या सुरुवातीस 'सार्वजनिक ग्रंथालये' स्थापन करण्याचा प्रयत्न झाला व पहिल्यांदाच ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रह हा सामान्य नागरिकांना मोफत उपलब्ध करून दिला गेला. १७०४ मध्ये स्कॉटलंडच्या जनरल असेंब्लीमध्ये लागोपाठ तीन वर्षात तीन कायदे संमत केले गेले. या कायद्यांन्वये सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली गेली.

ब्रिटिश म्युझियमचे एडवर्डस् एडवर्ड (१८१२-१८६६) यांचे असे मत होते की, सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना ही कायद्याद्वारे सार्वजनिक निधीतून (Public funds) केली जावी. त्यानुसार ब्रिटनच्या संसदेत १८४९ मध्ये या आशयावरील मसुदा मांडण्यात आला. या मसुद्यास १८५० मध्ये मंजुरी मिळून बिल प्रस्थापित झाले. अंतिमतः १४ ऑगस्ट १८५० मध्ये बिलाचे रूपांतर कायद्यात झाले. हा दिवस ग्रेट ब्रिटनमध्ये ग्रंथालयांच्या इतिहासात 'रेड लेटर डे' म्हणून ओळखला गेला. ग्रेट ब्रिटनचा हा कायदा जगातील पहिला सार्वजनिक ग्रंथालय कायदा होय.

त्याचप्रमाणे अमेरिकेत १८७६ पासून सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस सुरुवात झाली. मेलविल ड्युई यांनी फिलाडेल्फियामध्ये ग्रंथपालांची एक परिषद ४ ऑक्टोबर १८७६ मध्ये भरवली होती. जस्टिन विन्सर हे या परिषदेचे अध्यक्ष होते. विन्सर हे बोस्टन सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. या परिषदेतच 'अमेरिकन लायब्ररी असोसिएशन'ची स्थापना झाली. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट देशात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना व विकास करणे, शासनाकडून निधी प्राप्त करणे व या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर कायदा करणे हे होते.

## १.२ भारतातील सार्वजनिक ग्रंथालयांचा इतिहास (History of Public Libraries in India)

**(अ) स्वातंत्र्यपूर्व काळ :** भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा उगम बडोदा राज्यापासून सुरू झाला. महाराजा सयाजीराव गायकवाड-३ हे सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे आद्य जनक समजले जातात. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी युरोप आणि अमेरिका दौऱ्यादरम्यान तेथे पाहिलेल्या ग्रंथालय प्रणालीचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. त्यांनी अशा ग्रंथालय प्रणालीची सुरुवात बडोदा येथे करावी अशी संकल्पना प्रत्यक्षात मांडली. यासाठी १९१० मध्ये महाराजांनी अमेरिकन ग्रंथपाल, डब्ल्यू.ए.बोर्डेन (W.A.Borden) यांना बडोद्याला येण्याचे निमंत्रण दिले. बोर्डेन यांच्या येण्याचा प्रमुख उद्देश सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली निर्मितीसंबंधी मार्गदर्शन करणे असा होता. या संकल्पनेवरून बोध घेऊन भारतातील इतर भागांमध्येही बडोद्यासारखीच सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सुरू झाली.

१९३७ नंतर सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ राष्ट्रीय पातळीवर अनेक प्रांतांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये सुरू झाली. त्याप्रमाणे इंडियन लायब्ररी असोसिएशनने प्रांतीय सरकारला तसेच स्थानिक अधिकाऱ्यांना ग्रंथालये समृद्ध बनवण्यासाठी आर्थिक मदत देऊन सार्वजनिक ग्रंथालये निर्मितीचा प्रयत्न केला. या कार्यक्रमास 'रूरल अपलिफ्ट प्रोग्रॅम' असे संबोधित केले. ही संकल्पना १९४७ मध्ये 'सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑन एज्युकेशन' यांनी सुद्धा मान्य केली. याचे कारण म्हणजे ग्रामीण भागामध्ये प्रौढ शिक्षणास प्राधान्य देण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी सहभाग घ्यावा. अशा कार्यक्रमामुळे १९४२ पर्यंत भारताच्या बऱ्याच राज्यांमध्ये अंदाजे १३००० सार्वजनिक ग्रंथालये ग्रामीण भागात स्थापन झाली.

ए.ए.ए.फैजी यांच्या अध्यक्षतेखाली १९४० मध्ये 'द लायब्ररी डेव्हलपमेंट कमिटी बॉम्बे' स्थापन झाली. या कमिटीच्या अहवालाद्वारे अशी शिफारस केली की सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना सहा स्तरावर निर्माण करावी. जसे सेंट्रल लायब्ररी, रिजनल लायब्ररीज, डिस्ट्रिक्ट लायब्ररीज, तालुका लायब्ररीज, टाउन लायब्ररीज आणि व्हिलेज लायब्ररीज. ज्यामुळे सार्वजनिक ग्रंथालय चळवळ ही समाजाच्या सर्व भागांमध्ये पसरेल.

**(ब) स्वातंत्र्यानंतरचा कालखंड :** स्वातंत्र्यानंतर डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रयत्नाने 'मद्रास पब्लिक लायब्ररी बिल' १९४८ मध्ये सादर केले गेले. त्याचप्रमाणे, बॉम्बे सरकारने सेंट्रल लायब्ररीची स्थापना, मुंबई येथे करून तीन रिजनल लायब्ररीज पुणे, अहमदाबाद आणि धारवाड येथे स्थापन केल्या. १९४९ मध्ये नागपूर येथे झालेल्या ऑल इंडिया कॉन्फरन्समध्ये सार्वजनिक ग्रंथालय चळवळ सर्व स्तरांतील लोकांपर्यंत पोहोचवण्याची शिफारस केली गेली. डॉ.एस.आर.रंगनाथन यांनी यास 'युनिव्हर्सल मेंटल अवेअरनेस' असे संबोधले.

युनेस्कोच्या सहकाराने दिल्ली पब्लिक लायब्ररी १९५१ मध्ये स्थापन झाली व केंद्र सरकारने ग्रंथालय सेवा व देशातील ग्रंथालयांचे नेटवर्क वाढवण्यासाठी अनुदान दिले व बऱ्याच ठिकाणी जिल्हा ग्रंथालयांची निर्मिती झाली. १९५४ मध्ये 'द डिलीव्हरी ऑफ बुक्स ॲक्ट' हा कायदा मंजूर झाला व १९५६ मध्ये यात दुरूस्ती करून न्यूजपेपर या घटकाचा समावेश करण्यात आला. या कायद्यामुळे भारतातील प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथाची एक प्रत नॅशनल लायब्ररी, कलकत्ता, दी एशियाटिक सोसायटी (सेंट्रल) लायब्ररी, मुंबई, कोन्नमरा पब्लिक लायब्ररी, मद्रास आणि दिल्ली पब्लिक लायब्ररी, दिल्ली या ग्रंथालयांना देणे बंधनकारक झाले. यामुळे सार्वजनिक ग्रंथालयात ग्रंथसंग्रह विकसित होण्यास मदत झाली.

के.पी.सिन्हा कमिटीने ग्रंथपाल व सामाजिक शिक्षण कार्यकर्ते यांनी वाचकांमध्ये वाचनसंस्कृतीची जागृती निर्माण करावी व त्यांच्या गरजा जाणून घ्याव्यात अशी शिफारस केली. या समितीने 'मॉडेल लायब्ररी बिल'चा मसुदा तयार केला.



दिल्ली पब्लिक लायब्ररी, दिल्ली

प्लॅनिंग कमिशनने 'वर्किंग ग्रुप ऑन लायब्ररी'ची १९६४ मध्ये स्थापना केली. शिक्षणासाठी केलेल्या तरतुदीच्या १.५% रक्कम ही सार्वजनिक ग्रंथालयांवर खर्च करण्यात यावी अशी शिफारससुद्‌धा केली. या कालावधीतच कर्नाटक (१९६५) आणि महाराष्ट्र (१९६७) या दोन्ही राज्यात ग्रंथालय कायदे संमत झाले.

**राजा राम मोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशन (आर. आर.आर.एल.एफ.), कोलकाता व सार्वजनिक ग्रंथालय विकास**

'राजा राममोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशन' (RRRLF) ची स्थापना भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाने कोलकाता येथे २२ मे १९७२ रोजी केली. या संस्थेचा मुख्य उद्‌देश ग्रंथालय चळवळीचा प्रसार आणि प्रचार करणे व निरनिराळ्या राज्यांमध्ये ग्रंथालय कायदा विकसित करणे हा होता. भारत सरकार, प्लॅनिंग कमिशनने १९७२ मध्ये 'वर्किंग ग्रुप ऑन डेव्हलपमेंट ऑफ पब्लिक लायब्ररीज'ची स्थापना केली.

तसेच एकोणीस राज्यांमधून सार्वजनिक ग्रंथालय कायदे मंजूर झाले. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांच्या निर्मितीस चालना मिळाली.

| भारतातील विविध राज्यांतील सार्वजनिक ग्रंथालय कायदे | | |
|---|---|---|
| अनु.क्र. | कायदा अंमलात आल्याचे वर्ष | राज्य |
| १. | १९४८ | तामिळनाडू |
| २. | १९६० | आंध्र प्रदेश |
| ३. | १९६५ | कर्नाटक |
| ४. | १९६७ | महाराष्ट्र |
| ५. | १९७९ | पश्चिम बंगाल |

| | | |
|---|---|---|
| ६. | १९८८ | मणिपूर |
| ७. | १९८९ | हरियाणा |
| ८. | १९८९ | केरळ |
| ९. | १९९३ | गोवा |
| १०. | १९९३ | मिझोराम |
| ११. | २००० | गुजरात |
| १२. | २००१ | ओडिशा |
| १३. | २००५ | उत्तरांचल |
| १४. | २००६ | राजस्थान |
| १५. | २००६ | उत्तर प्रदेश |
| १६. | २००७ | बिहार |
| १७. | २००८ | पुदुच्चेरी |
| १८. | २००९ | अरुणाचल प्रदेश |
| १९. | २००९ | छत्तीसगड |

**आर.आर.आर.एल.एफ.ची प्रमुख उद्दिष्टे :**

- राज्य शासन, केंद्रशासित प्रदेश व इतर संस्थांच्या मदतीने सर्व देशात सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास करणे
- देशात ग्रंथालय चळवळ वाढीसाठी प्रयत्न करणे.
- ग्रंथालयांच्या विकासासाठी ग्रंथालय धोरण आखणे.
- सार्वजनिक ग्रंथालयांना आर्थिक व तांत्रिक साहाय्य देणे.
- ग्रंथालय विकासाशी संबंधित समस्यांवरील संशोधनास चालना देणे.
- देशातील सार्वजनिक ग्रंथालय विकासाच्या विविध बाबींविषयी शासनास सल्ला देणे.

**मुख्य प्रकाशने**

(i) Directory of Indian Public Libraries

(ii) Granthana : Indian Journal of Library Studies (Bi-annual)

(iii) RRRLF News Letter (Quarterly)

आर.आर.आर.एल.एफ.चे मुख्यालय कोलकाता येथे आहे व प्रादेशिक कार्यालये - मुंबई, दिल्ली, मद्रास आणि कोलकाता येथे आहेत.

## १.३ महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचा इतिहास

महाराष्ट्राला पूर्वी 'बॉम्बे प्रेसिडन्सी' व त्यानंतर 'बॉम्बे प्रॉव्हिन्स' असे म्हटले जात असे. ईस्ट इंडिया कंपनीने मुंबई येथे सार्वजनिक ग्रंथालय स्थापन केले. यानंतर १८०४ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटीने मुंबई मध्ये ग्रंथालयाची स्थापना केली.

दी एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे या संस्थेचा उदय लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे या संस्थेच्या माध्यमातून झाला. लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे ही संस्था इंग्लंड आणि आयर्लंड येथील रॉयल एशियाटिक सोसायटी या संस्थेशी संलग्न होती. लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे या संस्थेस १८२३ पासून रॉयल एशियाटिक सोसायटी असे संबोधले जात होते.

१९५४ मध्ये ही संस्था रॉयल एशियाटिक सोसायटी पासून स्वतंत्र झाली आणि तिचे नामकरण 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' असे करण्यात आले. इ.स.२००२ मध्ये या संस्थेचे नवीन नाव 'दी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' असे बदलण्यात आले.

महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयांच्या चळवळीत 'दी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**बॉम्बे नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक सोसायटी (१८२१):** बॉम्बे प्रेसिडन्सीमध्ये 'द बॉम्बे नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक सोसायटी'ची स्थापना झाली. या संस्थेस १८२७ पासून बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी असे म्हटले जाऊ लागले. १८३० मध्ये युरोपियन आणि इंडियन समूहाच्या संयुक्त प्रयत्नांतून बॉम्बे जनरल लायब्ररीची स्थापना बॉम्बे (मुंबई) येथे करण्यात आली.

**नेटिव्ह जनरल लायब्ररीज :** इ.स. १९०० पूर्वी अनेक 'नेटिव्ह जनरल लायब्ररीज'ची स्थापना करण्यात आली. ही ग्रंथालये जिल्ह्यांच्या ठिकाणी सुरू करण्यात आली. उदा., अहमदनगर, अहमदाबाद, धुळे, धारवाड, कारवार, कोल्हापूर , नागपूर, आर्वी, नडियाद, नाशिक, पुणे, सातारा, सावंतवाडी, सोलापूर, ठाणे इत्यादी. मुंबई येथील 'द नेटिव्ह जनरल लायब्ररी' १९४५ साली स्थापन झाली. हे ग्रंथालय 'पीपल्स फ्री रीडींग रूम अँड लायब्ररी' म्हणून ओळखले जात असे.

गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बेच्या प्रयत्नातून अनेक गावांमध्ये स्थानिक भाषेची ग्रंथालये जिल्हा, तालुका व गाव पातळीवर स्थापन करण्यात आली.

मराठी भाषेतील ग्रंथांची ग्रंथालये स्थापन करण्याच्या कल्पनेतून अनेक ठिकाणी अशी ग्रंथालये स्थापन करण्यात आली. ठाणे, मुंबई, पुणे येथे मराठी भाषेतील ग्रंथांकरिता सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यात आली.

थोडक्यात, महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची सुरुवात मोफत, मुक्त अभ्यासिका व सार्वजनिक ग्रंथालय याद्वारे झाली. या उपक्रमाची सुरुवात प्रथम अलिबाग येथे झाली.

**फैजी कमिटी :** १९३९ मध्ये श्री.बी.जी.खेर, बॉम्बे स्टेटचे पहिले मुख्यमंत्री यांनी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, बॉम्बे (मुंबई) येथे स्थापन करण्याच्या दृष्टीने एक समिती गठित केली. अहमदाबाद, पुणे आणि धारवाड या ठिकाणी तीन विभागीय ग्रंथालये स्थापन करण्याचे कार्य फैजी समितीकडे सोपवले. फैजी समितीने अनेक शिफारशी केल्या. या समितीच्या शिफारशीनुसार विभागवार, जिल्हा, तालुका व गाव पातळीवरही सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नाने १९६७ साली सार्वजनिक ग्रंथालय कायदा, १९६७ पारित झाला. सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या दर्जानुसार अनुदान प्राप्त होऊ लागले.

## १.४ सार्वजनिक ग्रंथालय कायदा : पार्श्वभूमी

सुसंस्कृत नागरिक हा लोकशाही समाजव्यवस्थेचा पाया समजला जातो. नागरिकांना सुसंस्कृत करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये समर्थपणे करू शकतात. याचे कारण सार्वजनिक ग्रंथालये सांस्कृतिक वारसा जतन करणारी तसेच भावी पिढ्यांना ज्ञान उपलब्ध करून देणारी संस्था म्हणून कार्यरत असते. सार्वजनिक ग्रंथालयांना समाजाचे विद्यापीठ व निरंतर शिक्षणाचे केंद्र समजले जाते. सार्वजनिक ग्रंथालयांच्या वाढीस व्यापक ग्रंथालय चळवळीची गरज असते. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना कायद्याची आवश्यकता असते.

सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा मुख्य हेतू म्हणजे सार्वजनिक ग्रंथालयांना आर्थिक स्रोत निर्मितीचा कायद्यानुसार मार्ग निश्चित करणे. यासाठी कायद्याद्वारे तरतूद करून साधारणतः आर्थिक स्रोत कशा प्रकारे निर्माण करता येईल हे स्पष्ट करणे होय. जसे, शासकीय किंवा अशासकीय अनुदान, देणगी स्वरूपात किंवा ग्रंथालयांसाठी कररूपात (Library Cess) आर्थिक स्रोत उपलब्ध करून देणे इत्यादी.

**ग्रंथालय कायद्याची आवश्यकता**

- सार्वजनिक ग्रंथालय कायद्याद्वारे ग्रंथालयास अर्थसाहाय्य करणारी यंत्रणा निर्माण करणे.
- सार्वजनिक ग्रंथालयांची प्रणाली विकसित करणे.
- सार्वजनिक ग्रंथालयात विविध स्तरावर विविध श्रेणीच्या अधिकारी वर्गाची नियुक्ती करणे.
- सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे माहिती सेवा देणे.
- वाचन साधनांचा व साहित्याचा सहकारी तत्त्वावर उपयोग करणे.

### १.४.१ भारतातील आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायदा (Model Public Library Act) निर्मिती

भारतीय राज्यघटनेनुसार ग्रंथालय सेवा हा राज्यांच्या कक्षेतील विषय आहे. त्यामुळे राज्यशासन व केंद्रशासित प्रदेशांकरिता सार्वजनिक ग्रंथालय कायदा संमत करण्याची व तो लागू करण्याची जबाबदारी आहे. सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेसंदर्भात धोरण निश्चित करून कायद्याद्वारे त्या धोरणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

डिसेंबर १९३० मध्ये बनारस येथे पहिली 'आशिया एज्युकेशनल कॉन्फरन्स' भरली होती. या परिषदेत सादर केलेला सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा डॉ. एस.आर.रंगनाथन यांनी तयार केला होता. सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची निर्मिती करण्याच्या दृष्टीने आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा हा पहिला प्रयत्न होय. हा कायदा इ.स.१९५७ आणि १९७२ मध्ये सुधारित करण्यात आला. यानंतर भारत सरकारने, राज्यांकरिता १९६३ मध्ये 'आदर्श सार्वजनिक ग्रंथालय' कायद्याचा मसुदा तयार करण्याच्या दृष्टीने ग्रंथालय सल्लागार

समितीची स्थापना केली. या समितीस के.पी.सिन्हा समिती असे म्हणतात. इ.स.१९६५ मध्ये प्लॅनिंग कमिशनने भारतात सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्याच्या दृष्टीने आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायदा तयार केला. इंडियन लायब्ररी असोसिएशन व राजा राममोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशन या संस्थांच्या साहाय्याने १९९० मध्ये राष्ट्रीय पातळीवर एक चर्चासत्र आयोजित केले. पी.वेंकटापय्या यांनी या चर्चासत्रात आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा मसुदा सादर केला. भारतातील सर्व राज्यांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा तयार करण्याच्या दृष्टीने हे केले गेलेले सुरुवातीचे प्रयत्न होय.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मॉडेल लायब्ररी बिल | डॉ.एस.आर.रंगनाथन | १९३० १९५७ १९७२ |
| २. | मॉडेल पब्लिक लायब्ररीज बिल | भारत सरकार, डॉ.एम.डी.सेन | १९६३ |
| ३. | मॉडेल पब्लिक लायब्ररीज बिल | नियोजन आयोग, भारत सरकार | १९६५ |
| ४. | मॉडेल पब्लिक लायब्ररीज बिल | व्ही.वेंकटापय्या, इंडियन लायब्ररी असोसिएशन आणि आरआरआरएलएफ | १९९० |

वरील तक्त्यातील मॉडेल लायब्ररी ॲक्टस्‌मधील शिफारशींमध्ये पुढील घटकांचा समावेश केलेला होता. सल्लागार समिती गठन, ग्रंथालय संचालक नियुक्ती, ग्रंथालय प्रणाली निर्मिती, आर्थिक तरतूद, मनुष्यबळ, नियमावली, सार्वजनिक ग्रंथालयांची कार्ये आणि प्रकाशनांची नोंदणी इत्यादी.

### १.४.२ महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा, १९६७

महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील मागण्या लक्षात घेऊन महाराष्ट्रामध्ये 'पब्लिक लायब्ररीज बिल' सादर केले. या कायद्याद्वारे राज्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीची निर्मिती करण्याचे निश्चित केले. ऐतिहासिक दृष्टीने कोल्हापूर संस्थानाने सुरुवातीला 'द कोल्हापूर पब्लिक लायब्ररीज ॲक्ट, १९४५' हा कायदा प्रस्तुत केला. परंतु सदर संस्थान हे महाराष्ट्रात विलीन झाल्याने हा कायदा अंमलात येऊ शकला नाही. यानंतर १९६७ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पब्लिक लायब्ररीज ॲक्ट, १९६७' मंजूर केला.

**'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा, १९६७' ची ठळक वैशिष्ट्ये**

**(१) ध्येय :** महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, देखभाल, संघटन आणि विकास करणे.

**(२) राज्य ग्रंथालय मंडळ :** यामध्ये शिक्षणमंत्री हा या मंडळाचा अध्यक्ष, शिक्षण खात्याचा राज्यमंत्री हा उपाध्यक्ष तर ग्रंथालयांचा राज्यस्तरीय संचालक हा पदसिद्ध सचिव असेल. हे मंडळ महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा प्रसार होण्याकरिता धोरण ठरवेल व कायद्याची अंमलबजावणी करेल.

**(३) ग्रंथालय संचालनालय आणि संचालक :** या कायद्यातील तरतूदींची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरीय ग्रंथालय संचालक नियुक्त केला जावा. या संचालनालयाचे मुख्यालय मुंबई येथे असेल. ग्रंथालय संचालनालयाचा प्रमुख हा सार्वजनिक ग्रंथालयांचा संचालक असेल.

**ग्रंथालय संचालनालयाची कार्ये पुढीलप्रमाणे**

(i) सार्वजनिक ग्रंथालयांची विविध स्तरावर राज्यात स्थापना करणे.
(ii) अनुदानाकरिता ग्रंथालयांची निवड करणे, त्यांच्या कार्यांची तपासणी करणे.
(iii) सार्वजनिक ग्रंथालयांकरिता मंजूर केलेल्या आर्थिक निधीचा उपयोग करणे व त्याचा हिशोब ठेवणे.
(iv) महाराष्ट्रात प्रकाशित झालेल्या ग्रंथांची सूची तयार करणे.
(v) कायद्याची अंमलबजावणी करणे.
(vi) सार्वजनिक ग्रंथालयांचा वार्षिक अहवाल मंडळास सादर करणे.
(vii) ग्रंथालय प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
(viii) महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा

विकास होण्याकरिता सर्व प्रकारचे सहकार्य करणे.

(ix) दुर्मिळ आणि जुने ग्रंथ, हस्तलिखिते व नियतकालिके यांचे जतन करणे.

**(४) ग्रंथालय कर्मचारी :** महाराष्ट्रामध्ये स्वतंत्र ग्रंथालय संचालनालय असून राज्यस्तरीय संचालक हा त्याचा प्रमुख आहे. ग्रंथालय संचालकाच्या मदतीस उप-संचालक व साहाय्यक संचालकांची नियुक्ती केली जाते. याशिवाय विविध विभागीय ग्रंथालयांमध्ये स्वतंत्र प्रशिक्षित ग्रंथपालांची नियुक्ती केली जाते.

**(५) ग्रंथालय निधी :** ग्रंथालयांच्या स्थापनेकरिता व विकासास पंचवीस लाख रूपयांचा निधी दिला जातो. परंतु, या कायद्यात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा विकास होण्याकरिता कशाही स्वरूपाचा कर घेण्याची तरतूद नाही. अप्रत्यक्षरित्या कित्येक स्थानिक स्वराज्य संस्थांकडून ग्रंथालय सेवा कर आकारला जातो. इतर अनेक मार्गांनी मिळवलेल्या देणग्या, केंद्र शासनाचे अनुदान, राजा राममोहन रॉय लायब्ररी फाऊंडेशनचे अनुदान इत्यादीचा उपयोग केला जातो.

**विशेष अनुदान :** ग्रंथालयांचे रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव, वर्धापन दिन इत्यादी साजरे करण्याकरिता १०,०००/- रूपयांचे विशेष अनुदान देण्यात येते.

**साधन खरेदीसाठी अनुदान :** अनुदानातील रकमेपैकी ५०% अनुदान दृक्-श्राव्य साधने खरेदी करण्यासाठी उपयोगात आणता येते.

**या कायद्यातील उणिवा :**

(i) ग्रंथालय कर घेण्याची तरतूद नाही.

(ii) ग्रंथालयांच्या अनुदानाकरिता १९६७ मध्ये दीड कोटी रूपयांची तरतूद राज्याच्या अंदाजपत्रकात केली होती. त्यानंतर वाचन साहित्य व ग्रंथालयांच्या इतर उपकरणांच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत. परंतु आर्थिक निधीत वाढ झालेली नाही व ती पुरेशीही नाही.

(iii) पगार वाढ : नैसर्गिकरित्या ग्रंथालय सेवकांना पगारवाढ द्यावी अशी सोय केलेली नाही.

(iv) नवीन ग्रंथालयांची स्थापना : नवीन ग्रंथालयांच्या स्थापनेकरिता वाढीव तरतूदीची गरज असून अशी तरतूद केलेली नाही.

## १.५ ग्रंथालय संघटना

संघटना म्हणजे सामाईक कार्याकरिता एकत्रित आलेला समुदाय होय. संघटना ही एक प्रकारे संस्था (organisations) व एक विशिष्ट समुदाय या दोहोंमध्ये सहकार्य प्रस्थापित करणारी यंत्रणा होय. संघटना या विविध स्वरूपाच्या असतात. या संघटना व्यावसायिक कार्ये, कर्मचारी, व्यापारी, व्यावसायिक सहकारी यांचे सामाईक हेतू, हितसंबंध, व्यावसायिक ध्येये (missions) यांचे संरक्षण करतात. उदा., व्यापाऱ्यांची संघटना, व्यावसायिक संघटना इत्यादी. अशा संघटना स्थानिक, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवर कार्य करतात.

ग्रंथालय संघटना ही ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील व्यावसायिकांचा (professionals) एक समुदाय आहे की जो व्यापक ध्येये (mission) आणि ग्रंथालय व्यावसायिकांच्या कल्याणाची काळजी घेतो. सामाईक आणि सहकार्याच्या आधारे कृती करण्यासाठी एखाद्या समूहाची गरज असते व यासाठी ग्रंथालय संघटनांची निर्मिती विविध देशात विविध स्तरांवर झाली आहे.

ग्रंथालय संघटना ग्रंथालय व्यावसायिकांमध्ये एक आंतरिक नाते (emotional bond) निर्माण करतात. व्यावसायिक संघटनांमुळे ग्रंथालयांच्या कार्यांची गुणवत्ता वाढते. त्यामुळे वाचकांमध्ये व समाजात संस्थेविषयी नावलौकिक वाढतो. व्यवसायास उच्च दर्जा प्राप्त होतो.

### १.५.१ ग्रंथालय व्यावसायिक संघटना : उद्दिष्टे आणि कार्ये

(i) ग्रंथालय व्यावसायिक संघटना या व्यवसायाशी संबंधित सर्व ग्रंथालय कर्मचारी तसेच ग्रंथालय व्यवसायाबद्दल आस्था व सहानुभूती असणाऱ्या सर्व व्यक्तींना सभासद करून घेते.

(ii) ग्रंथालयातील नवीन प्रवाहांचे ज्ञान व माहिती सभासदांपर्यंत पोहचवते.

(iii) ग्रंथालय व्यावसायिकांसाठी एक सामाईक व्यासपीठ उपलब्ध करते.

(iv) माहिती, संकल्पना, अनुभव, तज्ज्ञ व्यक्ती अथवा या शास्त्राशी संबंधित अद्ययावत ज्ञान, सेवाशर्ती व ग्रंथालय व्यावसायिकांचा दर्जा सुधारण्यास मदत करते.

(v) ग्रंथालय व्यावसायिकांकरिता चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा आयोजित करते.

(vi) संशोधनपर नियतकालिके, प्रकाशने इत्यादी प्रकाशित करते.

(vii) ग्रंथालय व्यावसायिकांसाठी नीतिमूल्यांची संहिता निर्माण करणे तसेच ग्रंथालयाची मानके विकसित करणे.

(viii) उपयोजक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, ग्रंथालय सप्ताह साजरा करणे, ग्रंथ प्रदर्शन भरवणे, ग्रंथालय साक्षरता अभियान राबवणे.

(ix) ग्रंथालय व्यावसायिकांच्या समस्या सोडवण्यास मदत करणे.

काही निवडक ग्रंथालय संघटनांची माहिती खाली दिली आहे.

### १.५.२ आंतरराष्ट्रीय ग्रंथालय संघटना

**(I) इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन्स (IFLA)**

इफ्ला ही ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्रातील प्रमुख आंतरराष्ट्रीय संघटना आहे. ही संघटना ग्रंथालय क्षेत्राशी संबंधित व्यावसायिकांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करते. ही संघटना १० सप्टेंबर १९२७ रोजी एडिनबर्ग, स्कॉटलँड येथे स्थापन झाली. या संघटनेचे प्रमुख कार्यालय नेदरलँडमधील 'हेग' या शहरात आहे. ही संघटना सुरुवातीस 'इंटरनॅशनल लायब्ररी अँड बिब्लियोग्राफिकल कमिटी' या नावाने स्थापन झाली.

१९२९ मध्ये या संघटनेचे 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन्स' (IFLA) असे नामांतर करण्यात आले. १९७६ मध्ये या संघटनेचे नाव 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन्स अँड इन्स्टिट्यूशन्स' असे झाले.

**इफ्लाची उद्दिष्टे**

(i) ग्रंथालय आणि माहिती केंद्रांमधून गुणात्मक माहिती सेवा देण्यासाठी मानके विकसित करणे.

(ii) ग्रंथालय व माहिती केंद्रांमधून दिल्या जाणाऱ्या माहिती सेवांच्या महत्वाची जाणीव करून देणे.

(iii) 'जागतिक पातळीवर माहिती प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य' (Freedom of Universal Access to Information) या तत्वाचा अंगीकार करणे.

(iv) विविध संस्था, व्यक्ती, हितसंबंधी संघटना यांना सभासदत्व देणे.

(v) इतर संस्था व संघटनांशी संबंध प्रस्थापित करणे. जसे, युनेस्को, युनायटेड नेशन्स, इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सायंटिफिक युनियन्स (ICSU) इत्यादी.

(vi) ग्रंथालय विकास, दुर्मीळ माहितीचे जतन, मानक निर्मिती, ग्रंथालय विकास कार्यक्रम, कॉपीराइट संदर्भात मार्गदर्शन, माहितीचे स्वातंत्र्य देणे, डिजिटल ग्रंथालय विकसित करणे, मनुष्यबळ विकास, सूचीय नोंदी करणे इत्यादी कार्यक्रम राबवणे.

**इफ्लाची महत्वाची प्रकाशने**

(i) इफ्ला जर्नल (त्रैमासिक)

(ii) कॅटलॉगिंग ऑफ बिब्लियोग्राफिक कंट्रोल आणि आयएसबीडी (त्रैमासिक)

याव्यतिरिक्त इफ्ला बरेचसे संदर्भ ग्रंथ नियमित प्रकाशित करते.

**(II) फेडरेशन फॉर इन्फरमेशन अँड डॉक्युमेंटेशन (FID)**

सुरुवातीस या संस्थेस 'फेडरेशन इंटरनॅशनल डी डॉक्युमेंटेशन' असे म्हटले जात होते. या संघटनेची स्थापना १२ सप्टेंबर १८९५ मध्ये ब्रुसेल्स येथे झाली. या संस्थेचे संस्थापक पॉल ऑटलेट आणि हेन्री लॉ फॉन्तेन हे होते.

सुरुवातीस ही संस्था 'ब्रुसेल्स इन्स्टिट्यूट' व 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बिब्लियोग्राफी (IIB)' व नंतर १९३१ पासून 'दी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर

डॉक्युमेंटेशन (IID)' या नावांनी ओळखली जाऊ लागली. १९३७ पासून ही संघटना 'फेडरेशन इंटरनॅशनल डी डॉक्युमेंटेशन' (FID)' या नावाने ओळखली जाऊ लागली. या संघटनेचे मुख्यालय ब्रुसेल्सहून हेग (नेदरलँड) येथे स्थलांतरित झाले. १९८६ पासून या संस्थेचे नाव 'इंटरनॅशनल फेडरेशन फॉर इन्फरमेशन अँड डॉक्युमेंटेशन' असे करण्यात आले. इ.स.२००२ पासून ही संघटना आता कार्यरत नाही.

ही संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक संघटना होती. यामध्ये अनेक संस्था व व्यक्ती सभासद होत्या. ज्यांचा सहभाग संशोधन, माहिती उत्पादने, माहिती प्रणाली आणि माहितीचे व्यवस्थापन या कार्यांशी निगडीत होता.

**एफआयडीची उद्दिष्टे**

(i) व्यावसायिक विकास (Professional Development) किंवा विकासाअंतर्गत ग्रंथालय क्षेत्रातील सात मुख्य कार्यक्रम म्हणजे व्यापार, आर्थिक व औद्योगिक माहिती, माहिती धोरण, माहितीशास्त्र, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, माहिती प्रक्रिया आणि उत्पादने व माहिती व्यवस्थापन हे होते.

(ii) शिक्षण व प्रशिक्षण, परिषदा व चर्चासत्रे, प्रकाशने व प्रकल्प, व्यावसायिकांचे व्यक्तिगत संबंध आणि सल्लामसलत सेवा या कार्यांवर मुख्यतः लक्ष केंद्रित करणे.

(iii) वर्गीकरणावर संशोधन करणे इत्यादी.

या संस्थेचे मुख्य योगदान म्हणजे युनिव्हर्सल डेसिमल क्लासिफिकेशन या वर्गीकरण पद्धतीची निर्मिती होय.

**एफआयडीची महत्वाची प्रकाशने**

(i) युनिव्हर्सल डेसिमल क्लासिफिकेशन (१९०५ पासून)

(ii) इंटरनॅशनल फोरम ऑन इन्फरमेशन डॉक्युमेंटेशन

(iii) आर अँड डी प्रोजेक्टस् इन डॉक्युमेंटेशन ॲण्ड लायब्ररियनशिप

(iv) एफआयडी डिरेक्टरी

### १.५.३ निवडक राष्ट्रीय ग्रंथालय संघटना

**(I) दी असोसिएशन फॉर इन्फरमेशन मॅनेजमेंट (ASLIB)**

aslib MANAGING INFORMATION

अस्लिबची स्थापना १९२४ मध्ये झाली. स्थापनेच्या वेळेस असोसिएशन ऑफ स्पेशल लायब्ररीज अँड इन्फरमेशन ब्युरो असे नाव होते व या नावातूनच अस्लिब हे लघुरूप तयार झाले. विशेष ग्रंथालयांच्या संदर्भातील सर्व बाबी अस्लिबकडून हाताळल्या जातात. उदा., संशोधन ग्रंथालये आणि प्रमुख औद्योगिक संस्थांची ग्रंथालये. या संघटनेचे नवीन नाव 'असोसिएशन फॉर इन्फरमेशन मॅनेजमेंट' हे आहे. याचे मुख्यालय लंडन (युके) येथे आहे.

**अस्लिबची उद्दिष्टे**

(i) माहिती व औद्योगिक क्षेत्रातील आणि व्यावसायिक संस्थाकरिता संशोधन कार्यात सल्लागार म्हणून कार्य करणे.

(ii) माहिती सेवांविषयी विपणन सर्वेक्षण करून त्यांचे अहवाल प्रकाशित करणे.

(iii) भाषांतर सेवा देणे. यासाठी अस्लिबकडे तज्ज्ञ भाषांतरकारांचे स्वतंत्र पॅनेल उपलब्ध आहे. तसेच वर्गीकरण पद्धतीवर संशोधन करणे व अद्ययावत ठेवणे इत्यादी.

(iv) माहितीशास्त्र विषयतज्ज्ञांकरिता प्रशिक्षण वर्ग चालवणे व निरंतर शिक्षणही देणे.

(v) आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रे आयोजित करणे व त्याचे अहवाल प्रकाशित करणे.

**अस्लिबची महत्वाची प्रकाशने**

(i) दी अस्लिब प्रोसिडिंग्ज

(ii) जर्नल ऑफ डॉक्युमेंटेशन

(iii) द करंट अवेअरनेस ॲबस्ट्रॅक्टस्

(iv) द प्रोग्राम (ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणावरील हे प्रमुख नियतकालिक आहे.)

(v) दी अस्लिब इन्फरमेशन मंथली

(vi) मॅनेजिंग इन्फरमेशन

(vii) लायब्ररी हायटेक न्यूज

(viii) टेक्निकल ट्रान्सलेशन बुलेटीन

(ix) हँडबुक ऑफ स्पेशल लायब्ररीयनशिप अँड इन्फरमेशन वर्क

**(II) दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन (ALA)**

एएलए ही सर्वात जुनी व मोठी जागतिक स्तरावरील संघटना होय. 'दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन'ची स्थापना १८७६ मध्ये झाली. १८७६ मध्ये मेलविल ड्युई यांनी आयोजित केलेल्या परिषदेमध्ये या असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या संघटनेचे मुख्यालय शिकागो येथे आहे. या संघटनेचे ध्येय ग्रंथालय सेवा व ग्रंथपालन व्यवसायाचा विकास करणे हे आहे.

**मेलविल ड्युई यांनी तयार केलेले दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशनचे ध्येय विधान (Motto)**

"दी बेस्ट रिडींग फॉर दी ग्रेटेस्ट नंबर, ॲट दी लिस्ट कॉस्ट."

**एएलए : महत्त्वाचे विभाग व त्यांची कार्ये**

(i) शालेय ग्रंथालय विभागामार्फत शालेय ग्रंथालयांना मदत करणे.

(ii) महाविद्यालय व संशोधन ग्रंथालयासाठी संघटनेद्वारे कार्य करणे.

(iii) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र तंत्रज्ञान यांचा प्रसार करणे.

(iv) सार्वजनिक ग्रंथालयांना सहकार्य करणे.

(v) संदर्भसेवा व प्रौढ नागरिकांना ग्रंथालयातून सेवा देणे.

(vi) ग्रंथालयांना तांत्रिक साहाय्य देणे.

**एएलएची महत्त्वाची प्रकाशने**

(i) अमेरिकन लायब्ररीज

(ii) एएलए टेकसोर्स ऑनलाईन

(iii) लायब्ररी टेक्नॉलॉजी रिपोर्टस्

(iv) आरडीए टूलकीट

**(III) स्पेशल लायब्ररी असोसिएशन (SLA)**

ग्रंथालय क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर माहिती सेवांचा पाया निर्माण करण्यात या संस्थेचे प्रमुख योगदान आहे. ही संस्था १९०९ मध्ये अमेरिकेत जॉन कॉटन डाना यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. जॉन कॉटन डाना हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होय.

या संघटनेचा प्रमुख हेतू विशेष सेवा देण्याचा आहे. एसएलएचे सदस्यत्व व्यक्ती, संस्था, सोसायटीज, म्युझियम्स्, वृत्तपत्र, ग्रंथालय इत्यादींना देण्यात येते. या संघटनेकडून सदस्यांकरिता अनेक कार्ये हाती घेतली जातात. जसे, संप्रेषण क्षेत्र, ग्रंथेतर वाचन साधनांचा विकास, साधनांचा उपयोग, ग्रंथालय क्षेत्रातील व्यावसायिकांचे कल्याण इत्यादी. एसएलए इतर संघटनांच्या साहाय्याने विविध प्रकल्प व परिषदांचे आयोजन करते.

**एसएलएची महत्वाची प्रकाशने**

कमर्शियल व औद्योगिक क्षेत्राशी संबंधित माहितीचे प्रसारण करण्यात एसएलएची खूपच मदत झाली आहे. एसएलएने आतापर्यंत पुढील संदर्भ ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

(i) डिरेक्टरी ऑफ स्पेशल लायब्ररीज

(ii) हँडबुक ऑफ कमर्शियल इन्फरमेशन सोर्सेस, इंडेक्सेस, उदा., इंडस्ट्रियल आर्ट इंडेक्स, ट्रेडनेम इंडेक्स, पब्लिक अफेअर्स इंडेक्स इत्यादी.

(iii) जर्नल्स : द स्पेशल लायब्ररीज, मंथली न्यूज लेटर स्पेशॅलिस्ट, ट्रान्स्लेशन मंथली.

**(IV) चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ लायब्ररी अँड इन्फरमेशन प्रोफेशनल्स (CILIP)**

इंग्लंडमधील लायब्ररी असोसिएशन (LA) या संघटनेचे नवीन नाव म्हणजे सिलिप (CILIP) होय. सिलिप ही ग्रंथपाल, माहितीशास्त्राचे तज्ज्ञ व ज्ञान

Chartered Institute of Library and Information Professionals

व्यवस्थापक या व्यावसायिकांची इंग्लंडमधील संघटना आहे. या संस्थेचे २००२ मध्ये सिलिप हे नामकरण झाले. या संघटनेचे मुख्यालय लंडन येथे आहे.

**सिलिपची महत्त्वाची प्रकाशने**

(i) इन्फरमेशन प्रोफेशनल (मंथली)
(ii) लायब्ररी अँड इन्फरमेशन अपडेट
(iii) लायब्ररी असोसिएशन रेकॉर्ड
(iv) एलआयएसजॉबनेट (रिक्रूटमेंट संदर्भातील वेबसाईट)

### १.५.४ भारतातील ग्रंथालय संघटना

**(I) दी इंडियन लायब्ररी असोसिएशन (ILA)**

दी इंडियन लायब्ररी असोसिएशनची स्थापना १९३३ मध्ये कोलकाता येथे पहिल्या ऑल इंडिया लायब्ररी कॉन्फरन्समध्ये झाली. आयएलएची स्थापना करण्यात के.एम.असादुल्लाह व इतरांचा मोठा सहभाग होता.

**आयएलएची उद्दिष्टे**

(i) ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देणे.
(ii) ग्रंथपालांना प्रशिक्षण देणे.
(iii) ग्रंथपालांचा दर्जा उंचावण्यास सहकार्य करणे.
(iv) ग्रंथालय शास्त्रातील संशोधन व सूची प्रकल्पात सहभाग घेणे.
(v) वार्तापत्र, नियतकालिके आणि ग्रंथ प्रकाशित करणे.
(vi) ग्रंथालये, प्रलेखन व माहिती केंद्रे स्थापन करणे.
(vii) ग्रंथालय कायदा संमत होण्यासाठी प्रयत्न करणे.
(viii) ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या संस्थांना संलग्नता देणे.
(ix) ग्रंथालय व्यवस्थापनाची मानके तयार करणे, नियम (norms) तयार करणे व मार्गदर्शनपर तत्त्वे प्रस्थापित करणे.

**आयएलएची महत्त्वाची प्रकाशने**

(i) ILA Bulletin
(ii) ILA News Letter
(iii) इंडियन लायब्ररी डिरेक्टरी
(iv) आयएलए मेंबर्स डिरेक्टरी

**(II) इंडियन असोसिएशन ऑफ स्पेशल लायब्ररीज अँड इन्फरमेशन सेंटर्स (IASLIC)**

इयॅस्लिकची (IASLIC) स्थापना कोलकाता येथे विशेष ग्रंथालये व ग्रंथपालांकरिता १९५५ मध्ये झाली.

**इयॅस्लिकची उद्दिष्टे**

(i) ज्ञान साधनांचे पद्धतशीरपणे संकलन, संघटन (व्यवस्थापन) आणि प्रसारण करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
(ii) ग्रंथालय आणि माहिती सेवा आणि माहिती प्रसारणाचा दर्जा सुधारणे.
(iii) विशेष ग्रंथालये आणि माहिती केंद्रांमध्ये सहकार्य निर्माण करण्याकरिता समन्वयाची भूमिका पार पाडणे.
(iv) ग्रंथालये, माहिती ब्युरो, प्रलेखन केंद्रे यांच्याकरिता मदत देणारी संस्था म्हणून कार्य करणे.
(v) विशेष ग्रंथालये व माहिती केंद्रांमधील कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक कौशल्यात सुधारणा होण्यास मदत करणे.
(vi) विशेष ग्रंथालये आणि माहिती केंद्रांकरिता संशोधन केंद्र म्हणून कार्य करणे.
(vii) विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांकरिता एक माहिती केंद्र म्हणून कार्य करणे.

**इयॅस्लिकची महत्त्वाची प्रकाशने**

(i) इयॅस्लिक बुलेटीन (त्रैमासिक)
(ii) इंडियन लायब्ररी सायन्स ॲबस्ट्रॅक्टस् (वार्षिक)
(iii) इयॅस्लिक न्यूज लेटर (मासिक)
(iv) वार्षिक परिषदांचे कार्यवृत्त (दरवर्षी प्रकाशित केले जाते) व ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावर ग्रंथ प्रकाशित केले जातात.

## १.६ डिलिव्हरी ऑफ बुक्स अँड न्यूजपेपर्स अॅक्ट, १९५४

प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स् अॅक्ट, १८६७ चा सुधारित कायदा म्हणजे डिलिव्हरी ऑफ बुक्स अँड न्यूजपेपर्स अॅक्ट, १९५४ होय. या कायद्यानुसार राष्ट्रीय ग्रंथालयास व भारतातील इतर चार सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथ व वृत्तपत्रे पाठवावी लागतात. हा कायदा मुळात फक्त ग्रंथांना लागू होता. परंतु, १९५६ च्या कायद्यातील तरतुदीनुसार वृत्तपत्रांचाही यात समावेश केला गेला. १९८५ पर्यंत राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता व इतर तीन सार्वजनिक ग्रंथालयांना या कायद्यानुसार ग्रंथ व वृत्तपत्रे प्रदान करण्याची तरतूद केली गेली.

या कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील सांस्कृतिक व बौद्धिक वारसा जतन करण्याचे कार्य होय.

**या कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये**

(१) दी प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट, १८६७ हा जुना कायदा प्रथम प्रिंटिंग प्रेस व वृत्तपत्रे यांनी प्रकाशित केलेला ग्रंथ आणि वृत्तपत्रे यांची नोंद घेण्यासाठी तयार केला गेला.

(२) द डिलिवरी ऑफ बुक्स अँड न्यूजपेपर्स अॅक्ट, १९५४ यात १९५६ मध्ये सुधारणा करण्यात आल्या.

(३) या कायद्याद्वारे संपूर्ण भारतात कोणत्याही भाषेत प्रकाशित झालेले ग्रंथ, पत्रके (pamphlets), संगीत क्षेत्राशी संबंधित प्रलेख, नकाशे (maps), तसेच वृत्तपत्रे इत्यादीचा समावेश केला आहे.

## १.७ कॉपीराइट कायद्याचा इतिहास

१८८६ मध्ये बर्न, स्वित्झर्लंड येथे 'दी इंटरनॅशनल कन्व्हेन्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ लिटररी अँड आर्टिस्टिक वर्क्स' साकारली होती. यालाच 'बर्न कन्व्हेन्शन' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर कॉपीराइट संबंधी चर्चा होऊन एक करार केला गेला. त्यानंतर जगात अनेक देशांमध्ये कॉपीराइट कायद्यास मान्यता देण्यात आली.

**भारतातील कॉपीराइट कायदा**

'द कॉपीराइट अॅक्ट, १९५७' या शीर्षकाखाली १४ जून १९५७ ला भारतासाठी कॉपीराइट अॅक्ट अंमलात आणला गेला. या कायद्यामध्ये कालानुरूप सुधारणा केल्या गेल्या आहेत (१९८२, १९८४, १९९२, १९९४, १९९९ व २०१२).

कॉपीराइट कायद्याअंतर्गत वाङ्मयीन कलाकृती (Literary Work), कलाविषयक कलाकृती (Artistic Work), संगीत कलाकृती (Musical Art), चलचित्र (Films) या सर्व प्रकारच्या निर्मितीच्या निर्मात्यास ठरावीक कालावधीपर्यंत संरक्षण प्राप्त करून देणे. तसेच कॉपीराइटमधील 'फेअर यूज' या तरतुदी अंतर्गत काही मजकूर वापरण्यास अभ्यासकांना परवानगी दिली जाते. त्याचप्रमाणे कॉपीराइट कायद्याचे उल्लंघन झाल्यास शिक्षेची तरतूदही केलेली आहे.

**कॉपीराइट संरक्षणाचे निकष**

(ii) कॉपीराइट कायद्याचे संरक्षण मिळण्याकरिता लिखाण हे मूळ (Original) स्वरूपात निर्मित झालेले असावे.

(iii) कॉपीराइटमुळे निर्मात्याच्या विचारधनाचे संरक्षण होऊन त्यास आर्थिक फायदा व्हावा हा मुख्य हेतू आहे.

(iv) कॉपीराइट हक्कामुळे निर्मात्याच्या परवानगीशिवाय मूळ साहित्याची प्रत तयार करणे, रूपांतर करणे किंवा बऱ्याच मोठ्या भागाचे प्रतिरूप मुद्रण करणे किंवा पुनर्मुद्रण केल्यास कॉपीराइट कायद्यान्वये ही बाब उल्लंघनीय ठरते. या कायद्यामुळे निर्मात्यांना आर्थिक आणि नैतिक हक्क प्राप्त होतात. कॉपीराइट कायदा हा कोणत्याही स्वरूपात व्यक्त केलेल्या माहितीस लागू होतो.

'फेअर यूज' या संकल्पनेअंतर्गत वापरकर्त्यास साहित्य वापरण्यास सूट दिली जाते. या तरतुदींनुसार कॉपीराइट कक्षेत असलेले वाचन साहित्य काही अंशी उपयोगात आणता येते.

उदा., (i) अभ्यास (ii) अध्यापन (iii) संशोधन (iv) वृत्त अहवाल (v) स्कॉलरशिप (vi) परीक्षा (vii) समीक्षण लिहिण्याकरिता (viii) ग्रंथपरिक्षणाकरिता (Reviews) (ix) टिप्पणी (comment) इत्यादी.

### १.८ बौद्धिक स्वामित्व हक्क (Intellectual Property Rights)

**बौद्धिक संपदा हक्क**

**कॉपीराइट (copyright)**

- वाङमयीन कलाकृती
- कादंबरी, नाटक, कविता
- सादरीकरणाच्या कला
- फिल्मस्, संगीतरचना
- चित्रकला, छायाचित्र
- शिल्पकला (sculpture)

**औद्योगिक संपदा (Industrial Property)**

- पेटंटस्
- ट्रेडमार्क्स
- इंडस्ट्रियल डिझाइन्स
- जिओग्राफिकल इंडिकेटर्स
- ट्रेड सिक्रेटस्, प्लँट व्हरायटीज
- इंटिग्रेटेड सर्किटस्

बौद्धिक स्वामित्व हक्क म्हणजे मानवी बुद्धीद्वारे निर्माण झालेली कोणतीही बौद्धिक निर्मिती.

बौद्धिक संपदेअंतर्गत कॉपीराइट व औद्योगिक संपत्तीचा समावेश होतो. औद्योगिक संपत्तीअंतर्गत पेटंटस्, ट्रेडमार्क, इंडस्ट्रियल डिझाइन, ट्रेड सिक्रेट, जिओग्राफिकल इंडिकेशन्स इत्यादींचा समावेश होतो. या संपत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ही खरेदी केली जाऊ शकते किंवा परवाना पद्धतीने (लायसेन्स) उपयोगात आणली जाऊ शकते.

बौद्धिक स्वामित्वाविषयीच्या कायद्यांना 'बौद्धिक स्वामित्व हक्क' असे म्हणतात.

बौद्धिक मालकी अथवा मालमत्ता संरक्षित करण्याचे अनेक मार्ग आहेत. पेटंटस्द्वारे नवीन संशोधनाचे संरक्षण केले जाऊ शकते. एखाद्या मशिनरीचे डिझाईन पेटंट कार्यालयात रजिस्ट्रेशन करून ते सुरक्षित ठेवले जाऊ शकते. नवीन लोगो अथवा ट्रेडमार्क्सचेही रजिस्ट्रेशन करता येऊ शकते. कॉपीराइट कायद्यांतर्गत कला, वाङ्मय, सिनेमा (फिल्म), गाण्यांचे रेकॉर्डस्, कॅसेट्स, संगणक प्रणाली (programmes) यांचे रजिस्ट्रेशन व संरक्षण केले जाऊ शकते. जैवशास्त्रीय संपत्ती (उदा., डीएनए चे नमुने), सांस्कृतिक वारसा यांचेही संरक्षण करता येते.

बौद्धिक स्वामित्वाद्वारे तंत्रज्ञान हस्तांतरण, उद्योग व्यवसायात संयुक्तिक प्रकल्प, परवाना, प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक इत्यादी क्षेत्रात वाढ होऊ शकते.

खालील कायद्यांनुसार बौद्धिक संपदा संरक्षित केली आहे.

| बौद्धिक संपदाविषयक कायदे | वर्ष |
|---|---|
| पॅरिस कन्व्हेन्शन फॉर प्रोटेक्शन ऑफ इंडस्ट्रियल प्रॉपर्टी | १८८३, १९७६, १९८९ (इंडस्ट्रियल प्रॉपर्टी) |
| बर्न कन्व्हेन्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ लिटररी अँड आर्टिस्टिक वर्क्स | १८८६, १९७१, १९९० |
| ट्रेड रिलेटेड आस्पेक्टस् ऑफ इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी ॲग्रिमेंट (ट्रिप्स)<br>(पॅरिस व बर्न कन्व्हेन्शन कायद्यात सुधारणा करणारा कायदा) | १९९४/१९९५ |
| पेटंट को-ऑपरेशन ट्रीटी (पीसीटी) | १९७८/२००४ |
| कॉपीराइट ॲक्ट | १९५७,१९८२, १९९२,१९९४, १९९९ (६० वर्षे) |
| पेटंट ॲक्ट | १९७०, १९९९, २००५ (२० वर्षे संरक्षण) |
| जिओग्राफिकल इंडिकेशन ॲक्ट | १९९९, २००० (१० वर्षे संरक्षण) |
| प्लँट व्हरायटीज | २००१ (१५ ते १८ वर्षे) |

ट्रीप्स ॲग्रिमेंटने (Trade Related Aspects of Intellectual Property) १९९४ मध्ये बौद्‌धिक संपदा हक्कांतर्गत खालील बाबींचा समावेश केलेला आहे.

(i) पेटंटस् - यात नवीन किंवा नाविन्यपूर्ण संशोधन समाविष्ट होते.

(ii) ट्रेडमार्क - यात व्यवसायामध्ये उत्पादनांवर व सेवांवर जी मुद्रा व चिन्ह वापरले जाते यांचा समावेश होतो.

(iii) जिओग्राफिक इंडिकेटर्स - यामध्ये ज्या भूभागात वैशिष्ट्यपूर्ण वस्तू किंवा उत्पादने व सेवा निर्माण होतात त्या भूभागाचे महत्त्व जोडले जाते, उदा., हापूस आंबा, बासमती तांदूळ, कोल्हापुरी चप्पल इत्यादी.

(iv) ट्रेड सिक्रेट - यामध्ये व्यवसायाअंतर्गत असणाऱ्या प्रक्रियांचा उत्पादना संदर्भातील गुप्तता या बाबींचा समावेश ह्यात होतो.

(v) इंडस्ट्रियल डिझाइन - एखाद्या उत्पादनाचे आरेखन (आकार, Design,आराखडा), कॉन्फिग्युरेशन, पॅटर्न ऑफ ऑर्नामेंटस्, एखाद्या वस्तूवरील कलाकुसर (जी डोळ्यांना भावते.)


(vi) प्लँट व्हरायटीज - शेती व फळबागा संदर्भातील नवीन संशोधन.

कॉपीराइट आणि त्यासंबंधातील हक्क (Copyright and Related Rights) याविषयीची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| बौद्‌धिक संपदेचे प्रकार | कायद्याचे संरक्षण/(स्वरूप) | कायदेशीर संरक्षणाचा कालावधी | उदाहरणे |
|---|---|---|---|
| वाङ्मयीन कलाकृती, कलाविषयक कलाकृती, संगीत कलाकृती, चलचित्र (Films) इ. | द कॉपीराइट ॲक्ट, १९५७ (यात २०१२ मध्ये सुधारणा करण्यात आली) | ६० वर्षे (लेखकाच्या मृत्युनंतर) | काव्यसंग्रह, नाटक, कादंबरी, गाण्यांच्या सीडीज, डेटाबेसेस, फिल्म्स् इत्यादी. |
| ट्रेडमार्क | द ट्रेड मार्क्स ॲक्ट, १९९९ (जुना कायदा ट्रेड अँड मर्कंटाईल ॲक्ट, १९५८) | १० वर्षे | एयर इंडियाचे चिन्ह 'महाराजा', बीएमडब्ल्यू कार कंपनीचा लोगो इ. |
| पेटंटस् | द पेटंट ॲक्ट, १९७० | २० वर्षे (पेटंट फाईल केलेल्या दिवसापासून) | उत्पादन पेटंटस्, प्रक्रिया पेटंटस्, नवीन उपयुक्त व कुणासही ज्ञात नसलेली कोणतीही बाब, सॉफ्टवेअर पेटंट, बायोलॉजिकल पेटंटस्, केमिकल पेटंटस्, संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर कॉम्प्युटर प्रोग्राम्स) |
| इंडस्ट्रियल डिझाइन्स | द इंडस्ट्रियल डिझाइन ॲक्ट, २००० | १० वर्षे | एखाद्या उत्पादनाचे आरेखन (आकार, Design,आराखडा), कॉन्फिग्युरेशन, पॅटर्न ऑफ ऑर्नामेंटस्, एखाद्या वस्तूवरील कलाकुसर (जी डोळ्यांना भावते.) |
| द जिओग्राफिकल इंडिकेशन किंवा इंडिकेटर | जिओग्राफिकल इंडिकेशन ऑफ गुडस् ॲक्ट, १९९९ | १० वर्षे | हापूस आंबा, कोल्हापुरी चप्पल, नागपूरची संत्री, दार्जिलिंगचा चहा, बासमती तांदूळ इत्यादी. |
| जैविक विविधता (Plant Varieties) | द प्रोटेक्शन ऑफ प्लँट व्हरायटीज अँड फार्मर्स राइटस् ॲक्ट, २००१ | १५ ते १८ वर्षे | एचएमटी तांदूळ (संकरित पद्धतीने केलेले नवीन उत्पादन) |
| इंटिग्रेटेड सर्किटस् | दॅ सेमीकंडक्टर इंटिग्रेटेड सर्किटस् लेआऊट डिझाइन्स ॲक्ट, २००० | १० वर्षे | इलेक्ट्रॉनिक सर्किट, इंटिग्रेटेड सर्किट असेंब्ली |

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**वॉटरमार्क** म्हणजे कागदावरील प्रतिमा व साचा (डिझाइन). वॉटरमार्क असलेला कागद प्रकाशसमोर धरल्यास कागदावरील प्रतिमा व डिझाइन्सच्या विविध छटा दिसतात. वॉटरमार्क पोस्टाची तिकिटे, चलनी नोटा व इतर शासकीय कागदपत्रांवर समाविष्ट केलेला असतो. त्यामुळे दस्तऐवज तसेच बनावट चलनी नोटा ओळखता येतात. काही खासगी संस्थाही त्यांच्या लेटरहेडवर बोधचिन्हाचा वॉटरमार्क समाविष्ट करतात.



## १.९ वाङ्‌मयचौर्य (Plagiarism)

ज्ञान निर्मितीकरिता शैक्षणिक/बौद्धिक लिखाण तसेच संशोधनाचे निष्कर्ष हे विद्वत नियतकालिकांमध्ये /साहित्यामध्ये प्रकाशित करणे गरजेचे असते. शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रात वाङ्‌मयचौर्य ही समस्या झाली आहे. मोठ्या प्रमाणावर माहिती उपलब्ध होऊन ती सहजासहजी प्राप्त होत असल्याने वाङ्‌मयचौर्याचे प्रमाण वाढत आहे. एखाद्या प्रलेखातील उपलब्ध माहिती स्वतःच्या लिखाणात जशीच्या तशी समाविष्ट करणे. या घेतलेल्या माहितीचा संदर्भ न देता ती समाविष्ट केली जाते. अशा कृतीस वाङ्‌मयचौर्य असे म्हणतात.

**वाङ्‌मयचौर्य तपासण्याची काही उपलब्ध साधने** (Tools to Detect Plagiarism) : वाङ्‌मयचौर्य तपासण्यासाठी काही व्यापारी तत्त्वावर (Commercial) तसेच काही मोफत (Open Source) सॉफ्टवेअर्स उपलब्ध आहेत. त्यापैकी काही निवडक सॉफ्टवेअर्स पुढीलप्रमाणे आहेत.

**कमर्शिअल सॉफ्टवेअर्स**

(i) टर्न-इट-इन (Turn-it-in), युएसए
(ii) प्लॅगस्कॅन (PlagScan), जर्मनी
(iii) आयथेंटिकेट (Ithenticate), युएसए
(iv) प्ले ट्रॅकर (Play Tracker), युक्रेनियम
(v) उरकुंड (Urkund), स्वीडन

**ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स**

(i) प्लॅग अवेअर (Plag Aware), जर्मनी
(ii) डोकोलोक (Docoloc), जर्मनी
(iii) वायपर (Viper), युके
(iv) पेपर रेटर (Paper Rater), युएसए

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१. सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची सुरुवात ............ देशामध्ये झाली.
(अ) अमेरिका (ब) भारत
(क) इंग्लंड (ड) फ्रान्स

२. विशेष ग्रंथालयांच्या संदर्भातील सर्व बाबी ............ ग्रंथालय संघटनेकडून हाताळल्या जातात.
(अ) अस्लिब (ब) एएलए
(क) सिलिप (ड) आयएलए

३. हापूस आंबा, कोल्हापुरी चप्पल ही ............ ची उदाहरणे आहेत.
(अ) ट्रेडमार्क (ब) जिओग्राफिक इंडिकेटर्स
(क) पेटंटस् (ड) ट्रेड सिक्रेट

४. ............ येथे ‘दी इंटरनॅशनल कन्व्हेन्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ लिटररी अँड आर्टिस्टिक वर्क्स’ साकारली होती.
(अ) बर्न (स्वित्झर्लंड) (ब) लंडन (यु.के.)
(क) मुंबई (भारत) (ड) हेग (नेदरलँड)